# जाहिरात क्र.८

कार्यालय : राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

पत्ता : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सिडको भवन, ५वा मजला, दक्षिण कक्ष,बेलापूर, नवी मुंबई.

फोन नं. : ०२२-६५२१३४४४

---

## पाहिजेत

**CSDCI / DGT यांनी प्राधिकृत केलेल्या "प्रशिक्षण देणा-या (Training Provider) संस्थाची निवड :-**

राज्यातील सर्व जिल्हयातील तालुक्यामधील किमान एका गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत अर्धकुशल गवंडयास प्रशिक्षण देण्यासाठी CSDCI / DGT यांनी प्राधिकृत केलेल्या प्रशिक्षण देणा-या "Training Provider" नोंदणीकृत कंपनी / संस्था यांचेकडून गवंडी प्रशिक्षणाचे CSDCI यांनी तयार केलेल्या Quality Pack नुसार प्रशिक्षण देण्यासाठी " Expression of interest " मागविण्यात येत आहेत. CSDCI यांनी निश्चित केलेल्या प्रती प्रशिक्षणार्थी प्रतीतास मानधनाच्या अनुषंगाने मानधन हे यशस्वी निविदा धारकाच्या मंजूर दराप्रमाणे प्रशिक्षण देणा-या संस्थेस देण्यात येईल. एका प्रशिक्षण देणा-या संस्थेस ३ जिल्हयातील प्रशिक्षणाची जबाबदारी देण्यात येईल. यामध्ये कमी - जास्त जिल्हयाची जबाबदारी देण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरी धारकाने राखून ठेवले आहे.

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १. | प्रति शिक्षणार्थी प्रती तास प्रशिक्षणाचा दर | ५० |
| २. | मागील ३ वर्षातील प्रशिक्षण दिलेल्या एकूण प्रशिक्षणार्थींची संख्या प्रत्येक १०० प्रशिक्षणार्थीस १ गुण | २५ |
| ३. | एकूण मागील ३ वर्षातील प्रशिक्षण दिलेल्या प्रशिक्षणार्थी परिक्षा पास झालेल्या प्रशिक्षणार्थीचे शेकडा प्रमाण (२०% पर्यंत - ५ गुण, ४०% पर्यंत - १० गुण, ६०% पर्यंत - १५ गुण, ८०% पर्यंत - २० गुण, १००% पर्यंत - २५ गुण ) | २५ |
| | **एकुण** | **१००** |

प्रशिक्षण देणा-या संस्थेने १. प्रकल्प समन्वयक : - ३ जिल्हयासाठी १, २. प्रकल्प व्यवस्थापक :- जिल्हानिहाय १, ३. पर्यवेक्षक :- तालुकानिहाय प्रशिक्षणनिहाय १, ४. प्रशिक्षक (Demostrater) प्रती घरकुल १ याप्रमाणे असे मनुष्यबळ CSDCI ने मान्य केलेल्या पात्रतेचे द्यावे लागतील.

सदरील गवंडी प्रशिक्षण निविदा १ वर्ष कालावधीसाठी बंधनकारक राहिल.

CSDCI / DGT यांनी प्राधिकृत केलेल्या प्रशिक्षण देणा-या (Training Provider) इच्छुक संस्थेनी सिलबंद लिफाफ्यामध्ये या कार्यालयाकडे दि. ०७.१.२०१७ रोजी दु.१.००वाजेपर्यंत अर्ज / " Expression of interest " पोहचतील अशा पद्धतीने पाठवावेत. उशीरा प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरील अर्ज / " Expression of interest " हे दि. ०७.१.२०१७ रोजी दु.३.०० वाजता निविदा धारकांसमोर उघडण्यात येतील.

ही निविदा कोणत्याही वेळी वा कोणत्याही कारणास्तव रद्द करणेचे तसेच जाहीरातीत बदल करण्याचे अधिकार खालील सही करणा-या अधिका-यास असतील. संस्था / कंपनी यांची निवड न झालेस पत्रव्यवहार केला जाणार नाही.अधिक माहिती करिता श्री.एस.आर.मालपाणी, शाखा अभियंता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेशी दुरध्वनी क्रमांक (०२२) ६५२१३४४४ यावर संपर्क साधावा.

Email id - directoriayruralhousing@gmail.com

(भारत शेंडगे)
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य.